**<u>ठळक बातम्या</u>**

- विधिमंडळसंमत विधेयकांवर कार्यवाही करण्यासाठी राष्ट्रपती किंवा राज्यपालांना कालमर्यादा घालण्याच्या निवाड्याबाबत सर्वोच्च न्यायालयाकडून केंद्र आणि सर्व राज्यसरकारांना नोटिसा जारी

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून ब्रिटन आणि मालदीवच्या दौऱ्यावर

- गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी स्थगित

- कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची कृषी समृध्दी योजना जाहीर

- मुंबई लोकल रेल्वे बॉम्बस्फोट खटल्यातल्या आरोपींच्या निर्दोष मुक्ततेला राज्य सरकारचं सर्वोच्च न्यायालयात आव्हान

**आणि**

- महिला क्रिकेटमधे भारत-इंग्लंड एकदिवसीय मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारताची दमदार फलंदाजी

**<><><><><><>**

विधिमंडळांनी संमत केलेल्या विधेयकावर स्वाक्षरी करण्यासाठी राष्ट्रपती किंवा राज्यपालांना कालावधी निश्चित करुन देणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्याबाबत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिलेलं विचारणा पत्र सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीला घेतलं आहे. सर्वोच्च न्यायालयाने आज त्यावर केंद्र आणि सर्व राज्यसरकारांना नोटिसा जारी केल्या.

तमिळनाडू विधानसभेने संमत केलेल्या विधेयकांवर स्वाक्षरी करायला राज्यपालांनी विलंब केल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं हा निवाडा दिला होता.

विधीमंडळानं संमत केलेलं विधेयक राज्यपालांनी पुनर्विचारासाठी परत पाठवल्यानंतर विधिमंडळात दुसऱ्यांदा संमत होउन आलं तर ते राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवता येणार नाही. तसंच या विधेयकावर ३ महिन्यांच्या मुदतीत कार्यवाही झाली नाही तर राज्यपालांची संमती गृहित धरली जाईल असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं होतं.

या निकालासंदर्भात संवैधानिक तरतुदींचा सल्ला मागणारं पत्र राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी घटनेच्या कलम १४३ नुसार सर्वोच्च न्यायालयाला पाठवलं आहे.

<><><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून ब्रिटन आणि मालदीवच्या दौऱ्यावर जात आहेत. दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात मोदी ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा करतील तसंच ब्रिटनचे राजे चार्ल्स यांची भेट घेतील. दोन्ही देशांच्या दौऱ्यात प्रधानमंत्री विविध उद्योगांच्या प्रतिनिधींशी चर्चा करतील, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव विक्रम मिस्त्री यांनी नवी दिल्लीत बातमीदारांना सांगितलं.

भारत आणि ब्रिटनच्या प्रधानमंत्र्यांच्या भेटीत प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय विषयांवर चर्चा होईल, असं मिस्त्री यांनी सांगितलं. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात प्रधानमंत्री मोदी २५ आणि २६ जुलै रोजी मालदीवच्या दौऱ्यावर जाणार आहेत. २६ जुलैला मालदीवच्या ६० व्या स्वातंत्र्यदिनाला प्रधानमंत्री प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या भेटीत प्रधानमंत्री मोदी मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोईज्जु यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करणार असून अनेक प्रकल्पांचं उद्घाटन करणार आहेत.

<><><><><><>

संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे विविध मुद्द्यांवर गदारोळ झाल्यानं कामकाज आधी १२ वाजेपर्यंत, नंतर २ वाजेपर्यंत आणि त्यानंतर दिवसभरासाठी  स्थगित करावं लागलं.

लोकसभेत सभापती ओम बिरला यांनी प्रश्नोत्तरांचा तास सुरु केल्यावर विरोधी पक्ष सदस्यांनी ऑपरेशन सिंदूर आणि बिहारमधलं मतदार याद्यांचं सखोल पुनरिक्षण या विषयांवर चर्चेची मागणी करत घोषणा द्यायला सुरुवात केली. गदारोळामुळे आधी १२ वाजेपर्यंत, नंतर २ वाजेपर्यंत, आणि शेवटी दिवसभरासाठी कामकाज तहकूब झालं. राज्यसभेतही हेच चित्र दिसलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यासाठी ‘कृषी समृद्धी योजना’ राबवण्याची घोषणा राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज केली. या योजनेत शेती क्षेत्रात दरवर्षी ५ हजार कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक केली जाणार आहे. यासंदर्भात आजच शासकीय अध्यादेश जारी केला आहे, असं कोकाटे यांनी नाशिकमध्ये आयोजित वार्ताहर परीषदेत सांगितलं.

कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवणं, पायाभूत सुविधा निर्माण करणं, उत्पादन खर्च कमी करणं, उत्पादकता वाढवणं, पिकांमध्ये विविधता आणणं, मूल्यसाखळी बळकट करणं, तसंच  हवामान अनुकूल आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देणं, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणं हे कृषी समृध्दी योजनेचं उद्दिष्ट आहे.

**<><><><><>**

वर्ष २०१८ ते २०२१ च्या राष्ट्रपती स्काऊट्स आणि गाईड्स पुरस्कारांचं वितरण आज नवी दिल्ली इथं राष्ट्रपती भवनात झालं. यावेळी शिस्त, समाजसेवा, नेतृत्व आणि अमूल्य योगदानाबद्दल १६ जणांना राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आलं.

राष्ट्र आणि समाजासाठी आयुष्य समर्पित करणं हा जगण्याचा सर्वोत्तम मार्ग असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपतींनी यावेळी केलं. युवकांमध्ये नीती मूल्यांबरोबरच निस्वार्थ सेवा आणि देशभक्तीचा आदर्श रूजवण्याचं काम भारत स्काऊट्स आणि गाईड्ससारख्या संस्था करत असतात, असे प्रशंसोद्गार मुर्मू यांनी काढले.

<><><><><>

मुंबईत उपनगरी रेल्वेगाड्यांमध्ये २००६मध्ये झालेल्या बॉम्बस्फोट खटल्यातल्या सर्व १२ आरोपींना निर्दोष मुक्त करण्याच्या निर्णयाला राज्य सरकारनं सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. त्यावर २४ जुलै रोजी सुनावणी होईल.

काल झालेल्या सुनावणीत उच्च न्यायालयानं सर्व आरोपींबाबतचा सत्र न्यायालयाचा निकाल रद्द करून त्यांची तातडीनं सुटका करण्याचे आदेश दिले. या घटनेत प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, घटनास्थळ आणि आरोपींकडून हस्तगत केलेलं साहित्य तसंच, कबुलीजबाब या तिन्ही पातळ्यांवर आरोपींविरुद्धचा एकही गुन्हा सिद्ध करण्यात तपास यंत्रणेला यश आलं नाही असं न्यायालयानं स्पष्ट केलं. या प्रकरणातल्या एकाही साक्षीदाराची साक्ष विश्वसनीय नसल्याचं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं आहे.

<><><><><>

महिला क्रिकेटमधे भारत-इंग्लंड एकदिवसीय मालिकेतला शेवटचा आणि निर्णायक सामना आज इंग्लडमधे चेस्टर्ली स्ट्रीट इथं सुरु आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे. भारताची सुरुवात दमदार झाली. करेणधार हरमनप्रित कौरनं अर्धशतक पूर्ण केलं असून, शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या ४१ षटकात ३ बाद २१२ धावा झाल्या होत्या.

आतापर्यंत दोन्ही संघांनी एकेक सामना जिंकला असल्यानं आज अटीतटीची लढत अपेक्षित आहे.

**<><><><><><>**

गडचिरोली इथं विविध प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते आज झालं. यात एमटीपीए स्टील प्रकल्प, कोनसरी इथलं शंभर खाटांचं रुग्णालय, सी बी एस ई शाळेची पायाभरणी, सोमनपल्ली इथं लॉयड्स टाऊनशिप, हेडरी ते कोनसरी स्लरी पाईपलाइन यांचा समावेश आहे. या प्रकल्पांमुळे १४ हजार जणांना रोजगार मिळाला असून आणखी वीस हजार जणांना रोजगार मिळणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. यामुळे गडचिरोलीचं चित्र पालटलं आहे, गडचिरोलीच्या जल आणि जंगलाचं संगोपन करण्याचा प्रयत्न सरकार करत आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**- होल्ड बाईट मुख्यमंत्री - -**

या कार्यक्रमानंतर गडचिरोली इथल्या कृषी महाविद्यालयाच्या प्रांगणात ४० लाख वृक्ष लागवड उपक्रमाचा प्रारंभ मुख्यमंत्री फडनवीस यांच्या हस्ते झाला.

**<><><><><><>**

अमेरिकेतून आयात केलेल्या बहुचर्चित अपाचे हेलिकॉप्टर्सपैकी पहिली ३ हेलिकॉप्टर्स आज भारतात दाखल झाली आहेत. या हेलिकॉप्टर्समुळे भारताच्या संरक्षण सिद्धतेला मोठाच हातभार लागणार असून लष्करी उड्डाण विभागाला विविध प्रकारच्या भूप्रदेशात कार्यक्षम कर्तव्य बजावताना त्यांचा उपयोग होईल असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे.

**<><><><><><>**

आज राष्ट्रध्वजदिन आहे. भारतीय संविधान सभेने १९४७ मधे २२ जुलै रोजी तिरंगी ध्वजाला राष्ट्रध्वज म्हणून मान्यता दिली होती. त्या निमित्त दरवर्षी हा दिवस राष्ट्रध्वजदिन म्हणून साजरा केला जातो. एक राष्ट्र, एक ध्वज - त्यागाने एकजूट आणि शांततेचं वचन ही यंदाच्या ध्वजदिनाची संकल्पना आहे.

**<><><><><><>**

वेव्हज ओटीटी मंचामुळे एक नवीन डिजिटल चळवळ सुरु होत असून त्याद्वारे ग्रामीण भागातल्या निर्मात्यांनी तयार केलेला पारंपरिक आशय देखील जागतिक स्तरावर पोचेल असं प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यांनी म्हटलं आहे. ते आज कंबोडियात सियाम रीप इथं २० व्या आशिया माध्यम शिखर परिषदेत वेव्ह्ज ओटीटी मंचाचं सादरीकरण करताना बोलत होते. या मंचावरचा आशय जगभरातल्या संस्था, जनसमुदाय आणि धोरणकर्त्यांपर्यंत पोचू शकतो. त्यामुळे सार्वजनिक सेवा प्रसारणकर्त्यांनी स्वतःचे निरनिराळे ओटीटी मंच तयार करण्यापेक्षा एकाच मंचावरून सर्व सेवा द्याव्यात असं ते म्हणाले.

//<><><><><><>//